नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष - २ रे<br>Year - 2nd | अंक - १९९<br>Issue - 199 | वार शुक्रवार दि. ६ डिसेंबर २०२४<br>Blow- Friday Date 6 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |

# फडणवीस तिसऱ्यांदा राज्याच्या मुख्यमंत्रीपदी

## एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ, अजित पवारांचा सहावा विक्रमी शपथविधी ; पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : निर्विवाद बहुमताची 'दुर्मीळ चीज' महाराष्ट्रातल्या मतदारांनी महायुतीकडे सोपवल्यानंतरही १३ दिवस निव्वळ सत्तेचे तंबोरे लावण्यातच गेले पीळ तर इतका वाढला की आता तारा तुटतात की काय अशीही कुजबूज सुरू झाली पण अखेर सूर जुळले! पाच डिसेंबरच्या गुरुवारी, पंतप्रधान आणि जनसमुदायाच्या साक्षीने आणि अर्थातच राज्यपालांच्या उपस्थितीत महाराष्ट्राला पाच वर्षांच्या खंडाने लाभलेल्या स्थिर सरकारची मैफल जमली आणि देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी जुगलबंदी सोडून एकदिलाने तीन तालात आळवलेला सत्तेचा बडा खयाल आता किती रंगतो याची उत्सुकता वाढली




पंचवार्षिक कार्यकाळ पूर्ण करणारे राज्यातील दुसरे मुख्यमंत्री आणि सर्वात कमी काळ पद भूषवणारे मुख्यमंत्री अशा दोन परस्पर टोकाच्या भूमिका बजावल्यानंतर मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा तिसरा कार्यकाळ गुरुवारी सायंकाळपासून सुरू झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, नेत्यांनी गजबजलेल्या भव्य व्यासपीठाच्या साक्षीने आणि उद्योगपती, कलावंत, क्रीडापटूंपासून सामान्य कार्यकर्त्यांपर्यंतच्या शेकडोंच्या गर्दीसमोर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाच शपथविधी पार पडला.

महायुतीला मिळालेल्या प्रचंड यशानंतर शपथविधी मोठ्या जल्लोषात करण्यात आला असला तरी मंत्र्यांची संख्या आणि खात्यांचे वाटप यावरून तिन्ही घटक पक्षांमध्ये सहमती न होऊ शकल्याने तिघांनीच शपथ घेतली. त्यामुळे अवघ्या २० मिनिटांत हा सोहळा आटोपला. फडणवीस हे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री बनले तर अजित पवार यांनी सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मुख्यमंत्री होऊन उपमुख्यमंत्री झालेले शिंदे दुसरेच. आझाद मैदानावरील या शपथविधी सोहळ्यात २० पेक्षा अधिक मंत्र्यांचा समावेश करण्याची मूळ योजना होती. मात्र, एकनाथ शिंदे यांची नाराजी दूर करण्यातच बराच वेळ गेला. यामुळे मंत्र्यांची संख्या व खात्यांचे वाटप यावर सविस्तर चर्चा होऊ शकली नाही. खातेवाटपावर शिंदे अडून बसल्याने राष्ट्रवादीनेही आपली भूमिका उघड केली नाही.

या दोन्ही पक्षांशी चर्चा करून महायुतीची एकी कायम ठेवण्याचे पहिले आव्हान फडणवीस यांना पेलावे लागणार आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' या आपल्या घोषणेचा पुनरूच्चार केला. जनतेने आम्हाला भरभरून दिले आहे. त्यामुळे लोकांच्या अपेक्षेचे आझेही अधिक आहे. मात्र येत्या काळात लोकांच्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. निवडणुकीच्या दरम्यान लोकांना दिलेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता सरकार करेल. मात्र त्यापूर्वी राज्याची वित्तीय स्थिती विचारात घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.







# 'वक्फ'मध्ये महत्त्वाचे बदल नाहीच? मूळ विधेयक लोकसभेत संमत होण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : वक्फ दुरुस्ती विधेयकामध्ये आवश्यक बदल सुचवण्यासाठी संयुक्त संसदीय समितीमध्ये (जेपीसी) सखोल चर्चा होत असली तरी, कोणतेही महत्त्वाचे बदल न करता लोकसभेत मूळ विधेयक संमत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यांच्या वक्फ मंडळांकडील जमिनीची मालकी निश्चित करण्यासंदर्भात मूळ विधेयकामध्ये ४८ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. त्यातील प्रमुख चार दुरुस्त्यांना 'जेपीसी'च्या बैठकांमध्ये 'इंडिया' आघाडीतील सदस्यांनी तीव्र विरोध केला. वक्फ मंडळावर बिगर मुस्लीम सदस्यांची नेमणूक होणार, वक्फ मंडळांवर निवडणुकीऐवजी नियुक्त्या केल्या जाणार, वक्फची जमीन निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना मिळणार आणि वक्फ मंडळाकडील जमिनींची नोंदणीची पूर्वलक्ष्यीप्रभावाने पडताळणी केली जाणार, या चार प्रमुख दुरुस्त्या केंद्र सरकारने विधेयकात समाविष्ट केल्या आहेत. विधेयकातून या दुरुस्त्या काढून टाकण्यास 'जेपीसी'तील सत्ताधारी सदस्यांनी विरोध केला आहे.



राज्यातील एका बड्या उद्योजकाला वक्फची जमीन दिली गेली. पूर्वलक्ष्यीप्रभावाने सगळ्या नोंदी आणि व्यवहार पाहिले जाणार असतील तर उद्योजकाशी वक्फ मंडळाने केलेल्या व्यवहाराची चौकशी करणार का, असा सवाल 'जेपीसी'तील सदस्य व शिवसेना-ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला. विरोधकांच्या महत्त्वाच्या चार आक्षेपांची दखल घेऊन वक्फ दुरुस्ती विधेयकात बदल केले पाहिजेत, असे सावंत यांनी सांगितले.

वक्फच्या जमिनी अनेकठिकाणी बळजबरीने घेतल्या गेल्या आहेत. त्याविरोधात कारवाई करण्याचे अधिकार सरकारकडे असले पाहिजेत. त्यासाठी जमीन नोंदणीची पडताळणी पूर्वलक्ष्यीप्रभावाने केली पाहिजे, असे मत भाजप खासदार व 'जेपीसी'च्या सदस्या मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. 'जेपीसी'तील सदस्यांनी वेगवेगळ्या राज्यांना भेटी दिल्या आहेत. पण, आणखी काही राज्यांना भेट देणे गरजेचे असेल तर आम्ही तिथल्याही संबंधित लोकांशी चर्चा करू, असे कुलकर्णी यांनी सांगितले. 'जेपीसी'चे सदस्य जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांना भेट देण्याची शक्यता आहे. 'जेपीसी'तील काही सदस्यांनी तसेच, बैठकीमध्ये सादरीकरण करणाऱ्या अनेकांनी वक्फ मंडळेच बरखास्त करण्याची सूचना केल्याचे समजते. पण, त्याबाबत 'जेपीसी'मध्ये सविस्तर चर्चा झालेली नाही. शिवाय, केंद्र सरकारच्या स्तरावरही ही सूचना गांभीर्याने घेण्यात आलेली नाही. त्यामुळे 'जेपीसी'च्या अहवालातही वक्फ मंडळाच्या बरखास्तीची शिफारस केली जाण्याची शक्यता नसल्याचेही समजते.

# सांगली, नाशिकला पावसाने झोडपले; रब्बी हंगामातील पिकांचेही नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली/नाशिक : सांगली जिल्ह्याच्या पूर्व भागाला गुरुवारी सायंकाळी पावसाने झोडपले. यामुळे रब्बी ज्वारीला लाभ होणार असला तरी द्राक्ष, डाळिंबाला फटका बसणार आहे. गेल्या चार दिवसांपासून ढगाळ हवामान असून थंडीही गायब झाली आहे. तसेच नाशिक जिल्हा परिसरात गुरूवारी अनेक ठिकाणी पहाटेच्या सुमारास अवकाळी पावसाने हजेरी लावली.

सांगलीत दिवसाचे तापमान ३१ अंश सेल्सियसपर्यंत होते, तर किमान तपमान २९ अंश सेल्सियस होते. गेल्या चार दिवसांपासून ढगाळ हवामान आणि पावसाचे वातावरण तयार झाले होते. दुपारच्या तीव्र उष्म्यानंतर सायंकाळी जत, कवठेमहांकाळ आणि मिरज पूर्व भागात अर्धा तास दमदार पाऊस झाला. पावसाने रानात पाणी साचले, तर कोळपणी झालेल्या शाळू पिकातही पाणी साचले. यामुळे शाळू पिकाला पोषक स्थिती निमर्ण झाली आहे. दरम्यान, या भागात द्राक्ष पिके वेगवेगळ्या टप्प्यात आहेत. काही बागा फुलोऱ्यात तर काही बागातील माल काढणीला आला आहे. अशा अवस्थेत पाऊस झाल्याने तयार माल तडकण्याची भीती आहे. पावसाने रब्बी हंगामातील कांदा रोप, कांदा पिके , गहू ,हरबरा ,द्राक्ष आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . लाल कांदा व इतर पिकांच्या उत्पादनावर विपरित परिणाम होईल. याबाबत प्रशासनाकडून पंचनाम्याचे आदेश देण्यात आले आहे.

**'लाडक्या बहिणीं'ना २१०० रुपयांसाठी अर्थसंकल्पापर्यंत प्रतीक्षा**

**विकासाची गती कायम ; देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही**

# महाराष्ट्र औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्नशील - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात महायुतीच्या सरकारमध्ये आमच्या भूमिका बदलल्या असल्या तरी गेल्या अडीच वर्षांत राज्याने विकासाची जी गती घेतली आहे. त्याच गतीने महाराष्ट्र पुढे जाईल. महाराष्ट्र आता थांबणार नाही तर सर्व क्षेत्रांत राज्य अग्रेसर राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर गुरुवारी दिली.

महायुती सरकारच्या शपथविधीनंतर नव्या सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी सरकारची पुढील दिशा स्पष्ट केली. निवडणुकीच्या दरम्यान लोकांना दिलेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता सरकार करेल. मात्र त्यापूर्वी राज्याची वित्तीय स्थिती विचारात घेतली जाईल. लाडक्या बहिणींच्या सन्माननिधीत वाढ करण्याचा निर्णय अर्थसंकल्प मांडताना घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नदीजोड प्रकल्प आणि सौरऊर्जा तसेच पायाभूत सुविधा प्रकल्पांना आपल्या सरकारचे प्राधान्य राहणार आहे. २०२६पर्यंत राज्यात सौरऊर्जेचे १६ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून नदीजोड प्रकल्पाची कामे सुरू केली जातील. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी करण्याची घोषणा फडणवीस यांनी यावेळी केली. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गामुळे मराठवाडा विदर्भाचा विकास होत असून या भागात नवीन उद्योग येत आहेत. आता नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाला गती देण्यात येणार असून या प्रकल्पाला सांगली जिल्ह्यापर्यंत कोणताही विरोध नाही, त्यामुळे तेथे महामार्गाचे आरेखन अंतिम करून पुढील प्रक्रिया सुरू केली जाईल, मात्र या प्रकल्पाला कोल्हापूर जिल्ह्यात प्रचंड विरोध होत असून शेतकऱ्यांशी चर्चा करूनच प्रकल्प पुढे नेला जाईल. विरोध कायम राहिला तर हा मार्ग सध्याच्या महामार्गाला जोडण्याबाबत किंवा त्याची दिशा बदलण्याबाबत विचार केला जाईल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

विरोधकांचे संख्याबळावरून मूल्यमापन करणार नाही तर त्यांनी योग्य विषय मांडल्यास त्यांचा सन्मान केला जाईल. तसेच विधिमंडळात विरोधी पक्षनेत्याबाबत अध्यक्ष जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल. राज्यातील सध्याच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत सरकार सजग राहणार असून या योजनांचे सामाजिक परीक्षण करण्याची व्यवस्था केली जाईल, असे फडणवीस म्हणाले.



राज्यात गेल्या पाच वर्षांत बरीच उलथापालथ झाली. बऱ्याच घटना घडल्या. मात्र येत्या काळात राज्यातील राजकीय संवाद संपणार नाही, याची खबरदारी सरकार घेईल. राजकीय संवाद वाढला पाहिजे, तो कधी संपणार नाही याची खबरदारी सर्वच राजकीय पक्षांनी घेण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. गरज वाटल्यास शक्ती कायद्यात काही बदल केले जातील, असे फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी फडणवीस यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली.

२६पर्यंत राज्यात सौरऊर्जेचे १६ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून नदीजोड प्रकल्पाची कामे सुरू केली जातील.

तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतरची त्यांची ही पहिलीच स्वाक्षरी होती. पुण्यातील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री वैद्याकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती. २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री वैद्याकीय सहाय्यता कक्षाचा प्रारंभ केला होता.

**वेगाने काम करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना**

जनतेच्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी अधिक वेगाने काम करण्याच्या सूचना नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत गुरुवारी दिल्या. फडणवीस यांनी शपथविधी सोहळा झाल्यानंतर मंत्रालयात जाऊन मंत्रिमंडळाची पहिली बैठक घेतली. त्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार उपस्थित होते. या बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फडणवीस, शिंदे व पवार यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना कामकाजाबाबत काही सूचना केल्या आणि अधिक गतीने व जोमाने काम करण्यास सांगितले. जनतेच्या सरकारकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. त्यासाठी आपल्याला अधिक वेगाने काम करावे लागेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रशासनाची गती वाढवून चांगले निर्णय घेऊ. जनतेच्या अडीअडचणी व समस्या समजावून घेऊ, असे ते म्हणाले.

## संपादकीय....

### गतिमान सरकार!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर तीनही नेते हे मंत्रालयात आले. त्यांनी मंत्रालयातील महापुरूषांच्या प्रतिमांना वंदन केले. शपथविधी झाल्यानंतर पहिल्या तासातच महायुती सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक मंत्रालयात झाली. शपथविधीनंतर लगेचच मंत्रिमंडळाची बैठक घेऊन हे सरकार गतिमान असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकप्रकारे दाखवून दिले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला सूचना केल्या आणि अधिक गतीने आणि जोमाने काम करण्यास सांगितले. जनतेच्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी आपल्याला अधिक वेगाने काम करावे लागेल, असे ते अधिकाऱ्यांना म्हणाले. आता गती वाढवू आणि अधिक खोलवर जाऊन चांगले निर्णय घेऊन शाश्वत विकास कसा साध्य करता येईल त्या दृष्टिकोनातून प्रयत्न करूयात, असेही ते म्हणाले. दरम्यान ७ डिसेंबर रोजी विधीमंडळाचे विशेष अधिवेशन होणार असल्याचीही माहिती समोर येत आहे. नवनिर्वाचित आमदारांना आमदारकीची शपथ देणे गरजेचे आहे. त्यासाठी कदाचित हे विशेष अधिवेशन घेतले गेल्याची शक्यता वर्तविली जात आहे. मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखांची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती. मंत्रालयात गेल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे लाडक्या बहिणींनी स्वागत केले. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यात ते म्हणाले की, मागच्या अडीच वर्षांत घेतलेले निर्णय यापुढेही नेले जातील. सर्व समाजांना घेऊन जाणारे लोकाभिमूख सरकार पुढील काळात पाहायला मिळेल.

## १८ तास अभ्यास अभियान : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अभियानाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात विद्यार्थी जीवनात १८-१८ तास अभ्यास केल्याचा इतिहास उपलब्ध आहे. तर मग त्यांचे पावलावर पाऊल ठेवावे म्हणून ६ डिसेंबर व १४ एप्रिल ला तसे एक दिवसीय अभियान काही व्यक्ती, संस्था, संघटना राबवित असतात. मात्र केवळ एक दिवस अभ्यास करून फार काही निष्पन्न होईल असे वाटत नाही. म्हणून आम्हाला असे वाटते की, विद्यार्थ्यांनी वर्षभर तसा प्रयत्न करावा म्हणून आम्ही उद्यापासून म्हणजे ६ डिसेंबर २०२४ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादनपर आदरांजली अर्पण करून विद्यार्थ्यांनी १८ तास अभ्यास करावा म्हणून उद्या दिनांक ६ डिसेंबर पासून याची सुरुवात करीत आहोत. तरी निवासी, अनिवासी (सशुल्क/नि:शुल्क, नाममात्र शुल्क) विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करण्यासाठी सहकार्य सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. तरी गरजू, असहाय, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल सोय उपलब्ध करून देणार आहे. तरी आपण सर्वांनी फ ुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक ४, साकेतनगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे संपर्क करावे. तसेच ९४२१६७८६२८ या क्रमांकावर आपले नाव नोंद करावे. जेणेकरून विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ डिसेंबर १९४५ ला म्हटल्याप्रमाणे मा-याच्या जागा काबीज करता येतील. तसेच १२ डिसेंबर १९५५ ला म्हटल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्त्वानुसार चारित्र्य संपन्न जीवन घडविता येईल. तसे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण फ ुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र येथे उपस्थित राहावे. ही अभियान संचालक बी. बी. मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. असे फ ुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# महापरिनिर्वाण महामानवाचे



आज भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा अडसष्ठावा महापरिनिर्वाण दिन. डॉ. आंबेडकर म्हणजे विज्ञान, मानवता व व्यक्तीस्वातंत्र्याचे अखंड ऊर्जा स्रोत आहे. तो न संपणारा विषय आहे. त्यांचे तत्त्वज्ञान व विचारसरणी समता, स्वातंत्र, बंधुता आणि न्याय ही मानवी मूल्य वृद्धिंगत करणारे आहे. जिथे माणसाला माणूस म्हणून जगता येत नसेल, जिथे शोषण व प्रचंड विषम तेमुळे श्वास घेता येत नसेल, तेथे डॉ. आंबेडकर नावाच्या सूर्याने मानवतेची किमया केली. डॉ आंबेडकर हे एका सामाजिक क्रांतीचे नाव नाही तर हजारो वर्षे अज्ञानाच्या गर्तेत कुजत पडलेल्या भेद भावाला समूळ नष्ट करणारी ऊर्जा आहे. ही ऊर्जा मानवी अधिकार, व्यक्ती स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग चेतवणारी आहे. वंचित , शोषित, पीडित यांना स्वाभिमान बहाल करणारी आहे. खरे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा समानार्थी शब्द म्हणजे आंबेडकर. बुद्ध, फुले, कबीर यांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रांगणात घेऊन जाणारे डॉ बाबासाहेब मानवमुक्तीचे प्रणेते आहेत. कारण जसे आंधळ्यांना डोळ्यांची गरज असते तसे मनुवादी विषमतेला हादरा देण्यासाठी न्याय व समानतेची गरज असते. सामाजिक न्याय आणि समानता आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे सामाजिक विषमता दूर झाल्याशिवाय समाज शिक्षित झाला असे म्हणता येणार नाही. त्यासाठी नुसते बोलून चालणार नाही तर कृती करावी लागेल. यासाठी डॉ. आंबेडकरांनी विषमतावादीना धक्के देऊन संघर्ष केला आहे. समोर पाणी दिसत आहे परंतु पाण्याला स्पर्श करण्याचा अधिकार नव्हता. जनावरापेक्षाही तुच्छ समजली जायचे. सावलीचा विटाळ मानत. पावलांचा ठशांचा विटाळ मांनणाऱ्या विषमतावादी व्यवस्थेला सुरुंग लावणारे डॉ. आंबेडकर समोर येतात आणि अनेक सामाजिक आंदोलनातून मानवी हक्काने अधिकाराची मागणी करतात. या सर्व सामाजिक आंदोलनाचे नाव होते. डॉ. आंबेडकर त्यांच्याकडे सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक वैचारिक क्रांतीच्या पाऊल खुणा होत्या. नव्या क्रांतीच्या जाणीव निर्माण करणारी प्रेरणा आहे.

आज आपण बाबासाहेबांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करत आहोत. आदरभाव व्यक्त करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर जनसमुदाय मोठ्या भक्ती भावाने लोटला आहे. मुंबईची व्यवस्था प्रभावी झाली आहे. दुसऱ्या बाजूला अभिवादनासाठी येणारी पिढी आंबेडकरांचा वारसा जपताना व्यवस्थेला अद्यापि ते प्रश्न विचारताना दिसत आहे का ?

व्यवस्थेला आमचा वाटा कुठे आहे ? जल, जंगल, जमीन, जनावरे आणि जैवविविधतेला समान वाटप होताना दिसत नाही. देशातील नैसर्गिक साधनांचे समन्यायी वाटप करा. जमिनीचे राष्ट्रीयकरण करा. गरिबांना जमिनी वाटून द्या. धरण साठ्याचे राष्ट्रीयकरण करा. नदी खोऱ्यांचे समान प्रमाणात वाटप करा आणि पाणीही नैसर्गिक संपत्ती आहे. त्यावर प्रत्येकाचा अधिकार आहे. तेव्हा प्रचंड जलसाठयांचे व नदीखोरांचे पाणी समप्रमाणात वाटप करावे. डॉ बाबासाहेब अभिप्रेत असलेला जलसमाजवाद समजून घेतला तर देशातील अनेक प्रश्न सुटू शकतील. देशातला महापूर, जलप्रलय, जलसंवर्धन, व्यवस्थाप नियंत्रण, शेती व नदी खोरे विकास रोजगार इत्यादी प्रश्न सहज सुटतील. केवळ मानसिकता बदलावी लागेल. बाबासाहेबांना समजून घ्यावा लागेल.

डॉ. आंबेडकर संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांच्या विचाराने प्रत्येक प्रश्नाचा वेध आपण घेत असतो. आंबेडकर आधुनिक भारताच्या जडणघडणीचे राष्ट्रनिर्माते आहेत. कारण त्यांनी समग्र परिवर्तनाचा व विकासाचा ध्यास घेतला होता. समग्र परिवर्तनाचा ध्यास घेतला होता उजेडाची पेरणी होती त्यांनी परिवर्तनाची ऊर्जा पेरली. नागवलेला माणूस त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू होता. यामुळेच आज देशाचे समाजकारण व राजकारण डॉ. आंबेडकरांचे नाव घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही. राज्यघटना लिहिताना त्यांनी शोषित आणि वंचित यांच्या अधिकाराला अग्रक्रम दिला. सर्वांना एक व्यक्ती एक मूल्य सिद्धांत दिला. समाजवादी धम्म दिला. भाषण स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. देशात कुठेही व्यवसाय करण्याचा अधिकार दिला. समानतेचा व स्वातंत्र्याचा धर्म स्वातंत्र्याचा अधिकार दिला. शोषण, सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क बहाल केले. भारताचे नागरिक म्हणून प्रत्येकाला कर्तव्याचा पाठ देखील घालून दिला. देशाच्या शाश्वत विकासासह एकात्मिक परिवर्तन त्यांना अभिप्रेत होते.

सध्याचे तंत्रज्ञान, पर्यावरण, हवामान आणि शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी वैचारिक वारसा उपलब्ध करून दिला. हीच मोलाची देणगी आहे. आज परिवर्तनाचा स्वीकार करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यामुळे आंबेडकर हे देश विकासाच्या नव्या युगाचे समांतरनाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान १६(४) च्या कलमानुसार सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास समाजात नोकरी आणि शिक्षण क्षेत्रात आरक्षण दिले. त्यामुळे आज आधुनिक आंबेडकरी समाज स्वाभिमानाने उभा आहे आज आरक्षणाचा लाभ घेणारे प्रत्येक जण आरक्षणवादी आहेत की आरक्षणभोगी ? संविधानवादी प्रतिगामी विचारधारेच्या लोकांनी बाबासाहेबांना केवळ आरक्षणापुरते मर्यादित ठेवले त्यांना अजूनही आंबेडकर समजून घ्यावा लागेल. बाबासाहेब एक व्यक्ती म्हणून एक विचार चळवळ होती. तो परिवर्तनवादी विचार व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार बनला. त्यामुळेच संपूर्ण क्रांतीच्या विचारापासून आपण दूर राहिलो असे वाटत आहे.

एक देश, एक संविधान, एक संसद, असणारी राज्यव्यवस्था राज्याची विधानसभा , केंद्र-राज्य यांचे संबंध, स्वायत्त संस्था, विविध भाषा, धर्म, संस्कृती असणारी नागरिक देश संरक्षणाची राष्ट्रीय फौज सर्वांना सर्वसमावेशक व लोकहितवादी मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, सेक्युलरिझम, बुद्धिवाद, विज्ञानवाद ही राष्ट्र निर्माण करण्यासाठी महत्त्वाची तरतूद अभ्यासपूर्ण रितीने मांडली. हाच देशाच्या संविधान संस्कृतीचा पाया घालून दिला. यासाठी आंबेडकरवाद समजून घ्यावा लागेल. तेव्हा तो स्वीकारणे आणि आंबेडकरवादी म्हणून जगणे, कारण तसे करणाऱ्यांना सगळ्यात आधी धर्माला आणि जातीला मूठमाती द्यावी लागेल. हे आजच्या अनुयायांना समजणे तितकेच गरजेचे आहे. सामाजिक विषमतेचे मूळ हे आर्थिक व्यवस्थेत नाही तर जातीव्यवस्थेत आणि पर्यायाने धर्म व्यवस्थेत आहे. गरिबाला श्रीमंत होता येते परंतु शुद्राला ब्राह्मण होण्याची भारतीय समाज रचनेत काही व्यवस्था किंवा तरतूद नाही. भारतीय समाजक्रांतीसाठी आंबेडकरवाद- मार्क्सवाद असा समन्वयाचा घाट घालणाऱ्यांचा, बुद्धिभेद करत आहेत.

या महापरिनिर्वाण दिनाच्यानिमित्ताने असे म्हणावे वाटते की भगवान गौतम बुद्धांनी जो संदेश दिला हे भिक्षभिक्षूनो, स्वयंप्रकाशित व्हा. अन्य कोणा व्यक्तीला शरण जाण्याऐवजी स्वतःला शरण जा. तेव्हा आपण धर्मविचार आणि विनय विचार समजून आत्मसात केला पाहिजे. दिघनीकाय ग्रंथातील महापरिनिर्वाण सुत्तामध्ये असे सांगतात की, अन्य व्यक्तीवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच्या पायावर उभे राहा. आत्मनिर्भर बना. म्हणजे बुद्ध आणि सांगितलेला अत्त दीप भव ध्यानात ठेवून प्रत्येक माहिती आणि विचार आपण सजगतेने स्वीकारली पाहिजे. अनुभव आणि बुद्धी याच्या आधारे झोकून पाहिला पाहिजे. तेव्हा स्वयंप्रकाशित होण्याची गरज आहे.

बाबासाहेबांनी केवळ संविधान दिलं नाही. उद्याच्या भविष्याच्या विचार केला आहे. समता, स्वातंत्र बंधुता, न्याय, या मूल्यांची पेरणी केल्यानंतर तो पृथ्वीतलावरील प्रत्येक माणसाला उपयोग होईल असा क्रांतीदर्शी विचार दिला. यामुळे या मूल्यांनी देशाच्या भौगोलिक आणि वैचारिक सीमा तोडून वैश्विक विचार दिला. त्यामुळेच बाबासाहेब वैश्विक विचारवंत म्हणून लौकिक प्राप्त केला आहे. बाबासाहेबांना त्याच्या बालपणी अनेक भयंकर प्रसंगांना तोंड द्यावे लागले. अपमान, उपेक्षा सहन कराव्या लागल्या. आपल्या समाजाला भोगावे लागले ही सल त्यांच्या मनात होती. यासाठी इथल्या वंचित, पिडीत, शोषित दलितांना अस्पृश्यांना सामाजिक समानता आणि स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मानव मुक्तीचे लढे ते लढताना दिसतात. केवळ स्वार्थासाठी त्यांनी संघर्ष केला नाही. भाकरी मिळावी म्हणून संघर्ष केला नाही. संपूर्ण समाजाला मुक्तीची वाट ते शोधत होते. विचार देताना विचार करायला लावणे महत्वाचे आहे.

आज आपण बाबासाहेबांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करत आहोत. आदरभाव व्यक्त करण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर जनसमुदाय मोठ्या भक्ती भावाने लोटला आहे. मुंबईची व्यवस्था प्रभावी झाली आहे. दुसऱ्या बाजूला अभिवादनासाठी येणारी पिढी आंबेडकरांचा वारसा जपताना व्यवस्थेला अद्यापि ते प्रश्न विचारताना दिसत आहे का ? आमच्या व्यवस्थेला वाटा कुठे आहे ? जल, जंगल, जमीन, जनावरे आणि जैवविविधतेला समान वाटप होताना दिसत नाही देशातील नैसर्गिक साधनांचे समन्यायी वाटप करा. जमिनीचे राष्ट्रीयकरण करा. गरिबांना जमिनी वाटून द्या. धरण साठ्याचे राष्ट्रीयकरण करा. नदी खोऱ्यांचे समान प्रमाणात वाटप करा आणि पाणीही नैसर्गिक संपत्ती आहे. त्यावर प्रत्येकाचा अधिकार आहे. तेव्हा प्रचंड जलसाठयांचे व नदीखोरांचे पाणी समप्रमाणात वाटप करावे. डॉ बाबासाहेब अभिप्रेत असलेला जलसमाजवाद समजून घेतला तर देशातील अनेक प्रश्न सुटू शकतील. देशातला महापूर, जलप्रलय, जलसंवर्धन, व्यवस्थाप नियंत्रण, शेती व नदी खोरे विकास रोजगार इत्यादी प्रश्न सहज सुटतील. केवळ मानसिकता बदलावी लागेल. बाबासाहेबांना समजून घ्यावा लागेल.

डॉ. आंबेडकर संविधानाचे शिल्पकार म्हणून त्यांच्या विचाराने प्रत्येक प्रश्नाचा वेध आपण घेत असतो. आंबेडकर आधुनिक भारताच्या जडणघडणीचे राष्ट्रनिर्माते आहेत. कारण त्यांनी समग्र परिवर्तनाचा व विकासाचा ध्यास घेतला होता. समग्र परिवर्तनाचा ध्यास घेतला होता उजेडाची पेरणी होती त्यांनी परिवर्तनाची ऊर्जा पेरली. नागवलेला माणूस त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू होता. यामुळेच आज देशाचे समाजकारण व राजकारण डॉ. आंबेडकरांचे नाव घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही. राज्यघटना लिहिताना त्यांनी शोषित आणि वंचित यांच्या अधिकाराला अग्रक्रम दिला. सर्वांना एक व्यक्ती एक मूल्य सिद्धांत दिला समाजवादी धम्म दिला. भाषण स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. देशात कुठेही व्यवसाय करण्याचा अधिकार दिला. समानतेचा व स्वातंत्र्याचा धर्म स्वातंत्र्याचा अधिकार दिला. शोषण, सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क बहाल केले. भारताचे नागरिक म्हणून प्रत्येकाला कर्तव्याचा पाठ देखील घालून दिला.

देशाच्या शाश्वत विकासासह एकात्मिक परिवर्तन त्यांना अभिप्रेत होते. सध्याचे तंत्रज्ञान, पर्यावरण, हवामान आणि शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी वैचारिक वारसा उपलब्ध करून दिला. हीच मोलाची देणगी आहे. आज परिवर्तनाचा स्वीकार करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यामुळे आंबेडकर हे देश विकासाच्या नव्या युगाचे समांतर नाव आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान १६(४) च्या कलमानुसार सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास समाजात नोकरी आणि शिक्षण क्षेत्रात आरक्षण दिले. त्यामुळे आज आधुनिक आंबेडकरी समाज स्वाभिमानाने उभा आहे आज आरक्षणाचा लाभ घेणारे प्रत्येक जण आरक्षणवादी आहेत की प आरक्षणभोगी ? संविधानवादी प्रतिगामी विचारधारेच्या लोकांनी बाबासाहेबांना केवळ आरक्षणापुरते मर्यादित ठेवले त्यांना अजूनही आंबेडकर समजून घ्यावा लागेल. बाबासाहेब एक व्यक्ती म्हणून एक विचार चळवळ होती. तो परिवर्तनवादी विचार व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार बनला. त्यामुळेच संपूर्ण क्रांतीच्या विचारापासून आपण दूर राहिलो असे वाटत आहे. एक देश, एक संविधान, एक संसद, असणारी राज्यव्यवस्था राज्याची विधानसभा , केंद्र-राज्य यांचे संबंध, स्वायत्त संस्था, विविध भाषा, धर्म, संस्कृती असणारी नागरिक देश संरक्षणाची राष्ट्रीय फौज सर्वांना सर्वसमावेशक व लोकहितवादी मूल्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, सेक्युलरिझम, बुद्धिवाद, विज्ञानवाद ही राष्ट्र निर्माण करण्यासाठी महत्त्वाची तरतूद अभ्यासपूर्ण रितीने मांडली. हाच देशाच्या संविधान संस्कृतीचा पाया घालून दिला. यासाठी आंबेडकरवाद समजून घ्यावा लागेल. तेव्हा तो स्वीकारणे आणि आंबेडकरवादी म्हणून जगणे, कारण तसे करणाऱ्यांना सगळ्यात आधी धर्माला आणि जातीला मूठमाती द्यावी लागेल. हे आजच्या अनुयायांना समजणे तितकेच गरजेचे आहे. सामाजिक विषमतेचे मूळ हे आर्थिक व्यवस्थेत नाही तर जातीव्यवस्थेत आणि पर्यायाने धर्म व्यवस्थेत आहे. गरिबाला श्रीमंत होता येते परंतु शुद्राला ब्राह्मण होण्याची भारतीय समाज रचनेत काही व्यवस्था किंवा तरतूद नाही. भारतीय समाजक्रांतीसाठी आंबेडकरवाद- मार्क्सवाद असा समन्वयाचा घाट घालणाऱ्यांचा, बुद्धिभेद करत आहेत. या महापरिनिर्वाण दिनाच्यानिमित्ताने असे म्हणावे वाटते की भगवान गौतम बुद्धांनी जो संदेश दिला हे भिक्षभिक्षूनो, स्वयंप्रकाशित व्हा. अन्य कोणा व्यक्तीला शरण जाण्याऐवजी स्वतःला शरण जा. तेव्हा आपण धर्मविचार आणि विनय विचार समजून आत्मसात केला पाहिजे. दिघनीकाय ग्रंथातील महापरिनिर्वाण सुत्तामध्ये असे सांगतात की, अन्य व्यक्तीवर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच्या पायावर उभे राहा. आत्मनिर्भर बना. म्हणजे बुद्ध आणि सांगितलेला अत्त दीप भव ध्यानात ठेवून प्रत्येक माहिती आणि विचार आपण सजगतेने स्वीकारली पाहिजे. अनुभव आणि बुद्धी याच्या आधारे झोकून पाहिला पाहिजे. तेव्हा स्वयंप्रकाशित होण्याची गरज आहे. बाबासाहेबांनी केवळ संविधान दिलं नाही. उद्याच्या भविष्याच्या विचार केला आहे.

समता, स्वातंत्र बंधुता, न्याय, या मूल्यांची पेरणी केल्यानंतर तो पृथ्वीतलावरील प्रत्येक माणसाला उपयोग होईल असा क्रांतीदर्शी विचार दिला. यामुळे या मूल्यांनी देशाच्या भौगोलिक आणि वैचारिक सीमा तोडून वैश्विक विचार दिला. त्यामुळेच बाबासाहेब वैश्विक विचारवंत म्हणून लौकिक प्राप्त केला आहे. बाबासाहेबांना त्याच्या बालपणी अनेक भयंकर प्रसंगांना तोंड द्यावे लागले. अपमान, उपेक्षा सहन कराव्या लागल्या. आपल्या समाजाला भोगावे लागले ही सल त्यांच्या मनात होती. यासाठी इथल्या वंचित, पिडीत, शोषित दलितांना अस्पृश्यांना सामाजिक समानता आणि स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मानव मुक्तीचे लढे ते लढताना दिसतात.यला लागणे हे महत्त्वाचे आहे. म्हणून आंबेडकर अनुयायी विचार करायला शिकला. त्यामुळेच आंबेडकरांनीही त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी पुस्तक खरेदी करताना दिसतात. ते विचार क्रांतीचे लक्षण आहे. म्हणूनच आज प्रतिगामी शक्तीने उत्तर देण्याची धमक आंबेडकरवादीच देऊ शकतो. बाबासाहेबांची ऊर्जा त्यांच्या शब्दात आहे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र अंगीकारला. या घोषणाचे विश्लेषण अनेक विचारवंत वेगवेगळ्या अंगाने करतात परंतु या मूलमंत्राने आंबेडकर अनुयायाच्या तीन-चार पिढ्या प्रवास झाला. समाज शिकला. नोकरी लागल्या. त्याची प्रगतीची इमारत उभी राहिली. परंतु आता काळ बदलतो आहे. समाजाची संरचना बदलत आहे. लोकशाही व्यवस्थेत जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण आले. त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात अमुलाग्र बदल दिसून येत आहे. आता शिक्षण आणि नोकरीचा संघर्ष करावा लागत आहे. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर राजकारण बदलले खरे चळवळीची तितकीच वाताहात झाली. बाजूने आंबेडकर अनुयायी संघर्ष करताना दिसत आहेत. तेव्हा बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याची प्रत्येकाला बदलावी लागणार आहे. केवळ बाबासाहेबांची पुस्तके डोक्यावर घेऊन नव्हे तर ते वाचून पचवावे लागणार आहेत. कारण ती पुस्तकेच उद्याचे क्रांतीचे होकायंत्र आहे. त्यातच क्रांतीची पावले दडलेली आहेत. हताश होण्याची गरज नाही. बाबासाहेबांच्या सामाजिक धार्मिक आणि राजकीय विचारांसोबत आर्थिक विचार देखील स्वीकारावे लागणार आहेत. समाजाची वैचारिक आणि सांस्कृतिक पोकळी भरून काढण्यासाठी आर्थिक विचारांची गरज आहे. आजच्या महापरिनिर्वाण दिनी आदरांजली अर्पण करताना परिवर्तनाचा ध्यास घ्या. वाचनाची कास धरा. वाचन, चिंतन, मनन, लेखन आणि कृतीची गरज आहे. केवळ विचार वाचून उपयोगाचे नाहीत तर त्यांचे विचार आचरणात आणण्याची गरज आहे आज आपण सन्मानाने स्वतंत्रपणे समानतेने जगत आहोत हे केवळ आंबेडकरांच्या विचार क्रांतीमुळे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणदिनी कोटी कोटी प्रणाम ....!

**– डॉ. दत्तात्रय गायकवाड ,**
**संपर्क : ९८६०५९१३०५**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

## उच्च दर्जाची नितीमुल्यांचे आचरण हीच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना खरी श्रध्दांजली

देऊळगाव राजा/प्रतीनिधी राजु भालेराव : आज दि.०६/१२/२०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनार्वाण दिवस आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या जिवनातील नितीमुल्यांचा उहापोह करुया.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान लिहीण्यात मोलाचे योगदान आहे. भारताच्या संविधानातून उच्च दर्जाची नितीमूल्ये स्वातंत्र्य,समता, बंधूता यांची शिकवण त्यांनी दिली. प्रत्येकाला सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय मिळाला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. तसेच प्रत्येक व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य मिळावयास हवे. प्रत्येकाला स्व-प्रतिष्ठा मिळाली पाहीजे असे त्यांचे मत होते. ही सर्व मुल्ये भारतीय संविधानात दिली असल्याने ह्या मुल्यांचे अनुकरण करणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

स्त्री-पुरुष समानता हे नितीमुल्य त्यांनी जिवनभर अंगिकारले. ज्या समाजात स्त्रीयांची उन्नती होत नाही, तो समाज प्रगत आहे असे मी मानत नाही. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणायचे. पाश्चिमात्य देशात स्त्रीयांना मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी संघर्षकरावा लागला. परंतू, आपल्या देशात भारतीय संविधानातच स्त्रीयांना मतदानाचा हक्क देण्यात आला. पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना सुध्दा संपत्तिचा हक्क, वारसहक्क, विवाह, पालकत्व, दत्तक, उत्तराधिकार मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी संसदेत हिंदू-कोडबिलमांडले. जर हे विधेयक संसदेत पारीत झाले असते तर स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरले असते. परंतू, हे विधेयक संसदेत पारित झाले नाही. त्यामूळे, त्यांनी कायदामंत्री पदाचा राजिनामा दिला. पुरुषांप्रमानेच स्त्रीयांना सुध्दा उच्च दर्जाचे शिक्षण मिळावयास हवे याबाबत ते आग्रही होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून स्त्री-पुरुष समानतेची शिकवण मिळते. या महापरिनिर्वाण दिनानिमीत्त आपण ही शिकवण अंगिकारण्याचा निर्धार करुया.

अस्पृशता निर्मूलनासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह असो किंवा नाशिकच्या काळाराम मंदिरातील प्रवेशासाठीचा संघर्ष असो त्यांनी कायमच सर्व माणसांना समान वागणूक दिली पाहिजे यासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. सर्व लोक समान आहेत. उच्च-निचता त्यांनी मान्य नव्हती. जातीवरुन व्यक्तींमध्ये केलेला भेदभाव त्यांना मान्य नव्हता. जातीयव्यवस्था असमानता रुजविण्याचे काम करते. म्हणून अशी असमानतेची शिकवण देणारी व्यवस्था आपण भारतीयांनी नाकारली पाहिजे असे त्यांचे मत होते. समाजात असमानता निर्माण करणारी जातीव्यवस्थेचे निर्मूलन करण्यासाठी त्यांनी जाती-व्यवस्थेचे निर्मूलन हे पुस्तक लिहीले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून सर्व व्यक्ती समान आहेत. ह्या नितीमूल्याची शिकवण मिळते. या महापरिनिर्वाण दिनानिमीत्त आपण हे नितीमूल्य अंगिकारण्याचा प्रयत्न करुया अशाप्रकारे निर्मीती होईल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# देऊळगाव राजा तालुक्यातील चार लघु प्रकल्प संत चोखामेळा सागर प्रकल्पातून भरा



## अन्यथा अन्नत्याग आंदोलनाचा कैलास नागरे सह सहकाऱ्यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देऊळगाव राजा/प्रतिनिधी

देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ येथील महाराष्ट्र शासन सन्माननीत युवा शेतकरी कैलास अर्जुनराव नागरे आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी देऊळगाव राजा तहसी-लदारा मार्फत जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिलेल्या निवेदनात मागण्या मान्य कराव्या अन्यथा १५ डिसेंबर २०२४ पासून शिवणी आरमाळ लघु प्रकल्पात अन्नत्याग आमरण उपोषणाचां इशारा दिला आहे.

अरबी समुद्राचे खारे पाणी गोड करून आणून सोडा किंवा नदी जोड प्रकल्प करून पाणी आणून सोडा किंवा संतचोखामेळा सागरातील डाव्या कालव्याद्वारे संत चोखामेळा सागराचे शिल्लकचे खडपूर्णा नदीत जाणारे पाणी आनुन सोडा किंवा टँकर द्वारे पाणी आणून सोडा परंतु माझ्या अंढेरा फाट्या पासून.खालील शिवणी आरमाळच्या लघुप्रकल्पात किंवा परिसरातील त्यापेक्षा हजारों हेक्टर क्षेत्र बारमाही सिंचित होईल एवढे पाणी आणून सोडा आणि परिसरातील अंढेरा रामेश्वर लघु प्रकल्प तसेच गुंजाळा परिसरातील असोला गुंजाळा असोला अंढेरा लघुप्रक्लप मेंडगावचे लघुप्रक्लप आदी परिसरातील अंढेरा फाट्यापासून खालील धरणे हे बारमाही तुडुंब भरलेले राहतील एवढे पाणी संत चोखामेळा सागर प्रकल्पातील शिल्लकचे खडकपूर्णा नदीत सोडले जाणारे पाणी संत चोखामेळा सागरातील डाव्या बाजूच्या कालव्याद्वारे शिल्लकचे पाणी सोडून तुडुंब भरण्यात यावे त्यामूळे या परिसरात हरितक्रांती एकाच हंगामात नक्कीच घडून येईल आणि परिसरातील अंढेरा,शिवणी आरमळ,धोत्रा नंदई,सुरा,नागनगाव,पाडली शिंदे,सावखेड नागरे,मेंडगाव,बायगाव, गुंजाळ आसोला, सेवानगर अश्या १२ ते १५ गावे आणि त्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल तसेच या गावांच्या हजारो हेक्टर क्षेत्र बारम ाही सिंचित होऊन परिसर सुजलाम् सुफलाम् होत आर्थिक दृष्ट्या सक्षम नक्कीच होइल परिसरातील शेतकरी शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोग करत सामाजिक आर्थिक आणि सांसकृतिक समृद्धी प्राप्त करत विभागात राज्यात देशात विदेशात आदर्श निर्माण करतील असा विश्वास देतो या बाबत. त्यांनी केलेल्या तीन मागण्या,शिवणी आरमाळ लघु प्रकलपाचे नामकरण हे शिवणी आरमाळ या गावाच्या ग्राम दैवत श्री आनंद स्वामी महराज यांच्या नावावरून (ब दर्जा प्राप्त देवसंस्थान ) श्री आनंद स्वामी लघु प्रकल्प असे नामकरण शासन दरबारी करण्यात यावे.शिवणी आरमाळ लघु प्रकल्पाचे गेल्या ३० वर्षा पासून उखळलेया पिचींगचे दुरस्तीचे काम करून त्या लघु प्रकल्पावर च्या भिंतीवर जंगलाचे स्वरूप निर्माण केलेल्या जवळपास ३० वर्ष आऊर्मान असलेल्या झाडाझुपांचे निर्मूलन करावे.तसेच परिसरातील अंढेराचे रामेश्वर लघु प्रकल्प व गुंजाळा परिसरातील असोला अंढेरा गुंजाळा लघु प्रकल्प मेंडगाव परिसरातील लघु प्रकल्प शिवणी आरमाळ शिवारा-तील शिवणी आरमाळ लघु प्रकल्प आदी परिसरातील लघु प्रकल्प श्री संत चोखामेळा सागरातील खडकापूर्णा नदीत सोडले जाणारे शिल्लक चे पाणी डाव्या बाजूच्या कालव्याद्वारे पाणी सोडून तुडुंब भरण्यात यावे अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे निवेदन देते वेळी उमेश बाबुराव आरमाळ, रामप्रसाद उत्तम परहाड ,दत्ता एकनाथ नागरे, परमेश्वर बळीराम सोनुने ,गणेश त्र्यंबक आरमाळ,विशाल प्रकाश वायाळ,आंनदा सखाराम कायंडे, सचिन नामदेव सोनुने,सुनील रामदास पवार, गजानन पंढरी आरमांळ, दीपक अशोक राठोड,योगेश तेजराव आरम ाळ,योगेश दिलीप आरमाळ अनेक उपस्थित होते.या निवेदनाच्या प्रतिलिपी एस.डी.ओ कार्यालय सिंदखेड राजा, देऊळगाव राजा तहसीलदार मार्फत जिल्हाधिकारी बुलढाणा,तहसील कार्यलय मार्फत देऊलगावा राजा कार्यकारी अभियंता संत चोखामेळा सागर प्रकल्प कार्यालय देऊळगावराजा मुख्य उपविभागीय कार्यकारी अभियंता मृद व जलसंधारण विभाग देऊळगाव राजा यांना दिल्या आहे.

# श्री जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेत बीट स्तरीय क्रीडा स्पर्धा प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गौडगाव बुख येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेच्या क्रीडांगणावर अक्कलकोट बीटस्तरीय क्रीडा स्पर्धे चे उदघाटन अक्कलकोट पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबळे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलन करण्यात आले.



प्रथमतः क्रीडांगणाचे पूजन असिस्टंट गव्हर्नर रोटरी क्लबचे जितेंद्र जाजू,हत्तिकणबस केंद्रप्रमुख सुरेश शटगार यांचे हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी होते.क्रीडा स्पर्धेचे प्रास्ताविक व स्व-ागत केंद्रप्रमुख भीमाशंकर धडके यांनी केले.यावेळी खो-खो, कबड्डी, लंगडी ,धा-वणे ,इत्यादी स्पर्धेचे संघ सहभागी झाले. परमेश्वर व्हसुरे यांनी क्रीडा शपथाची साम ुदायिकरित्या वाचन करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक लाडप्पा शिंदे, सुभाष घोडके ,अमरेश ताराके, पोपट सोनकांबळे, तुकाराम जाधव, श्रीशैल सावळतोट तर पंच म्हणून सुतार सर, शिंगे सर , मोसलगी सर, कलबुर्गी सर ,सोनकर सर, ज्योती पाटील मॅडम आदींनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बीटस्तरीय सर्व क्रीडा शिक्षकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवपुत्र चोळळे यांनी केले तर लक्ष्मीपुत्र देशेट्टी यांनी आभार मानले.

# सोलापूरच्या प्रमिला ठमके यांचे राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी): छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा योगासन असोसिएशन स्पोर्टस् यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजिलेल्या ४१ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय योगासन सोलापूरच्या स्पर्धेत प्रमिला ठमके यांनी ६५ ते ७५ या वयोगटातून व्दितीय क्रमांक प्राप्त केला.

या स्पर्धेमध्ये ठमके या योगसाधना मंडळाच्या माध्यमातून सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धे त राज्यभरातून ४०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

ठमके यांनी घवघवीत यश संपादन केल्याने त्यांना सिल्व्हर पदक व प्रमाणपत्र




देऊन गौरविण्यात आले. त्यांना आरती गोरटे, स्नेहल पेंडसे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच या स्पर्धेमध्ये प्रमिला ठमके यांच्याशिवाय सोलापुरातून जयश्री उमर्जीकर , प्रभा कोडले, दिव्या राका, मोनिका गड्डम, शांता संगा व अशोक बिराजदार यांनी सहभाग नोंदवून विविध वयोगटातून घवघवीत यश संपादन केले.

# मुख्यमंत्रीपदाच्या शपथेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**पुण्याच्या रुग्णाला पाच लाखांची मदत**

मुंबई : मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत.

चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

## १४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय

**फडणवीस, श्री. देवेंद्र गंगाधरराव**

जन्म : २२ जुलै, १९७०

जन्म ठिकाण : नागपूर

शिक्षण : एलएल.बी. (नागपूर विद्या-पीठ तृतीय मेरिट), एम.बी.ए., डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डी.एस.ई. बर्लिन, जर्मनी येथून उत्तीर्ण

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अमृता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदार संघ : ५२ - नागपूर (दक्षिण-पश्चिम), जिल्हा - नागपूर.

इतर माहिती :

कार्यकारी सदस्य, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (युनायटेड नेशन्सद्वारा मान्यता प्राप्त संस्था): उपाध्यक्ष, दि सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल), उपाध्यक्ष, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था, अध्यक्ष, स्व. आबाजी थत्ते अनुसंधान संस्थानचे नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट, नागपूर; अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केट बॉल संघटना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, विविध उपक्रमात सहभाग.

१९८९ वॉर्ड अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष, धरमपेठ वॉर्ड, नागपूर; १९९० प्रसिद्धी प्रमुख, भाजप, नागपूर (पश्चिम); १९९२-९५ अध्यक्ष, भाजप युवा मोर्चा, नागपूर शहर; १९९५-२००४ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, भारतीय जनता युवा मार्चा; २००४ - २००९, २००९ - २०१४ राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; २००९ भाजप विदर्भ निवडणूक प्रमुख, २०१० महामंत्री, २०१२-२०१४ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; ग्लोबल पार्लमेंट या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भार-ताचे प्रतिनिधीत्व करणारे प्रथम भारतीय लोकप्रतिनिधी; उपाध्यक्ष, ग्लोबल पार्लमेंट फोरम, हाबीतात; १९९२ व १९९७ नागपूर महानगर पालिका सदस्य व १९९७ म ध्ये महापौर, महानगरपालिका, नागपूर; १९९८ मे अरइन कौन्सिल पद्धती अंतर्गत महाराष्ट्रातील प्रथम महापौर म्हणून निवड;

१९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९, २०१९-२०२४ सदस्य, म हाराष्ट्र विधानसभा, सदस्य, विधानमंडळ नियम समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, विनंती अर्ज समिती, गृहनिर्माण व नगरविकास स्थायी समिती सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण समिती; सदस्य, कार्यकारी परिषद डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ; ओ.बी. सी, नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची उत्पन्न मर्यादा वाढविण्यासाठी यशस्वी प्रयत्न; अध्यक्ष, निती आयोग शेती विषयक उच्चाधिकार समिती, भारत सरकार, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्यावतीने सन २००३ या वर्षाचा महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटु पुरस्कार प्राप्तः 'उत्कृष्ट वक्ता' म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त; रोटरी क्लबचा मोस्ट चॅलेंजिंग युथ अॅवार्ड प्राप्त, हिंदू लॉ विषयात नागपूर विद्यापीठाचा बी. के. बोस अॅवॉर्ड प्राप्त; प्रमोद महाजन यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा मुक्तचंद पुणे या संस्थे तर्फे उत्कृष्ट संसदपटु पुरस्कार, प्रकाश जोशी यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या राजयोगी नेता पुरस्काराने सन्मानीत; राज्य व राष्ट्रीय स्तरा-वरील अनेक पुरस्कारांनी सन्मानीत.

यशदा, पुणे येथे अर्बन फायनान्सिंग विषयावर व्याख्याने दिली. ३१ ऑक्टोबर २०१४ ते २१ नोव्हेंबर, २०१९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, २२ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर, २०१९ दुसऱ्यांदा मुख्यमंत्री, म हाराष्ट्र राज्य, डिसेंबर २०१९ ते जून २०२२ महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्ष नेते.

३० जून २०२२ रोजी उपमुख्यमंत्री पदा-ची शपथ, खाती - गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण, ऊर्जा, राजशिष्टाचार.

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ.

(संदर्भ - १४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)



**शिंदे, श्री. एकनाथ संभाजी**

जन्म : ६ मार्च १९६४.

जन्म ठिकाण : अहिर, तालुका - म हाबळेश्वर, जिल्हा - सातारा.

शिक्षण : बी.ए.

ज्ञातभाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती लता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : उद्योग व सामाजिक कार्य

पक्ष : शिवसेना

मतदार संघ : १४७ - कोपरी - पाचपाखाडी, जिल्हा - ठाणे.

इतर माहिती :

ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, सन १९८६ मध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न आंदोलनात १०० कार्यकर्त्यांसह सक्रीय सहभाग, ४० दिवस बेल्लारी येथे तुरुंगवास सहन केला, संपूर्ण ठाणे शहर व जिल्ह्यात सामाजिक कार्याचे जाळे निर्माण केले; ठाणे शहरात ओपन आर्ट गॅलरी, सचिन तेंडुलकर मिनी स्टेडियम, इंटरनिटी सुविधा भूखंडावर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, शहिद हेमंत करकरे क्रीडा संकूल, जॉगिंग पार्क, सेंट्रल लायब्ररी सुरु केली;

आदिवासी प्रभाग मोखाडा, तलासरी व जव्हार येथील आश्रम शाळेत व आरोग्य केंद्रात सकस आहार व आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन करुन गरीब रुग्णांना विनामुल्य औषध वाटप केले; पालघर, बोईसर व सफाळे परिसरात शिवसेने तर्फे एस.एस.सी. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन, गरीब विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप, पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन, बाल नाट्य महोत्सवाचे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, 'जाणताराजा' नाटकाचे अत्यल्पदरात आयोजन, अध्यक्ष, ठाणे जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन; उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अॅथलेटिक्स संघटना, पूरग्रस्तांना मदत,

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी विशेष योगदान; एमएमआरडी सक्षम बनविण्यात यश, नागपूर - मुंबई समृध्दी महामार्ग, वांद्रे- वरळी सी लिंक, वाशी येथील तिसरा खाडीपुल, मुंबई - पुणे द्रुतगतीमार्गची क्षमता वाढविण्यासाठी खालपूर- लोणावळा टनेल मार्ग, शिळ - कल्याण रस्त्याचे सहापदरीकरण, विदर्भात रेल्वेच्या २७ उड्डाणपूलाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न;

राज्यातील द्रुतगती मार्गावरील उपधान कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या; ओझर्डे येथे ट्रामा केअर सेंटर सुरू केले; आरोग्य मंत्रीपदाच्या काळात आशा सेविकांची पगार वाढ केली; आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस. पदवी धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला.

ठाणे शहरातील धोकादायक इमार-तींचा पुनर्विकास केला; ठाणे मेट्रोच्या कामाला गती दिली; ठाणे- मुलुंड दरम्यान नव्या स्थानकाला मंजुरी मिळविली; ठाणे जिल्ह्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या काळू धरणाच्या अडचणी सोडविण्यात यश; बारवी धरणाची उंची वाढविण्यासाठी मंजूरी मिळविली; एमएमआरडीला क्लस्टर योजना सुरू केली; ठाणे जिल्हा परिषद, तसेच कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, म हानगरपालिकेत व अंबरनाथ, बदलापूर नगर परिषदेत शिवसेनेची सत्ता आणण्यात यश; १९८४ शिवसेना शाखा प्रमुख, वागळे इस्टेट, किसननगर; शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख; पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग, १९९७ व २००२ दोन वेळा नगरसेवक, तीन वर्षे स्थायी समिती सदस्य, चार वर्षे सभागृह नेता, महानगरपालिका ठाणे.

२००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ २०१९-२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१४-२०१९ विधीमंडळ शिवसेना पक्षाचे गट नेते; १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री; तसेच जानेव-ारी २०१९ सार्वजनिक आरोग्य खात्याचा कार्यभार व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री; डिसेंबर २०१९ पासून शिवसेनेचे गट नेते; नोव्हेंबर २०१९ - जून २०२२ नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री.

३० जून २०२२ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ. खाती - सामान्य प्रशासन, नगरविकास, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.

(संदर्भ - १४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)

**पवार, श्री. अजित अनंतराव**

जन्म : २२ जुलै १९५९

जन्म ठिकाण : देवळाली प्रवरा, तालुका - राहुरी, जिल्हा - अहमदनगर.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञातभाषा :मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनेत्रा.

अपत्ये :एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २०१ - बारामती, जिल्हा-पुणे,

इतर माहिती :

विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवान-ीनगर, तालुका इंदापूर; संचालक, श्री. छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि. भवानीनगर; संचालक, माळेगाव सहकारी साखर कारखाना, लि. संचालक, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, लि. जिल्हा पुणे, संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई, संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे; मार्च १९९१ ते ऑगस्ट १९९१ तसेच डिसेंबर १९९४ ते डिसेंबर १९९८ अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; ११ डिसेंबर १९९८ ते १७ ऑक्टोबर १९९९ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई; १९ डिसेंबर २००५ पासून संचालक, म हाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई; २८ सप्टेंबर २००६ पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, मार्च २०१३ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, सप्टेंबर २००५ ते २३ मार्च, २०१३ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, १३ ऑगस्ट २००६ ते १९ ऑगस्ट २०१८ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन;

१७ जून १९९१ ते १८ सप्टेंबर १९९१ सदस्य, लोकसभा १९९१-९५ (पो.नि.), १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४- २०१९, २०१९-२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; २८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९२ कृषी, फलोत्पादन व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, १९९२ ते फेब्रुवारी, १९९३ जलसंधारण, ऊर्जा व नियोजन खात्याचे राज्यमंत्री; २७ ऑक्टोबर १९९९ ते २५ डिसेंबर २००३ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे), फलोत्पादन खात्याचे मंत्री; २६ डिसेंबर २००३ ते ३१ ऑक्टोबर २००४ ग्रामविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे) खात्याचे मंत्री; ९ नोव्हेंबर २००४ ते ७ नोव्हेंबर २००९ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ७ नोव्हेंबर, २००९ ते ९ नोव्हेंबर २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व ऊर्जा खात्याचे मंत्री; ११ नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि ऊर्जा); २२ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१९ उपमुख्यमंत्री, डिसेंबर २०१९ - जून २०२२ उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), काहीकाळ राज्य उत्पादन शुल्क या खात्याचा अतिरिक्त कार्यभार.

जुलै २०२३ मध्ये उपमुख्यमंत्रीपदाची शपथ, खाती - वित्त व नियोजन

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.

(संदर्भ - १४वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)

## थोडक्यात...

### आ. दत्तात्रय भरणे यांनी पोलिस संरक्षण नाकारले

इंदापूर प्रतिनिधी : नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये आमदार दत्तात्रय भरणे यांनी बलाढ्य प्रतिस्पर्धी उमेदवार हर्षवर्धन पाटील यांना सहज चितपट करून ऐतिहासिक हॅट्रिक केली आहे. त्यांच्या विजयाचे अनेक पैलू आहेत.यात प्रामुख्याने सतत लोकांच्या संपर्कात राहणे व जनसामान्यांमध्ये त्यांची सहज असणारी उपलब्धता हेच त्यांच्या यशाचे खरे गमक असल्याचे आवर्जून सांगितले जाते.आमदार दत्तात्रय भरणे हे २०१४ पासून इंदापूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. परंतु आमदार भरणे हे कधीही पोलिसांच्या गराड्यात वावरताना जनतेला दिसले नाहीत.ते विना पोलिस संरक्षण अगदी सहजपणे मतदार संघात फिरत असतात. त्यामुळे आमदार दत्तात्रय भरणे हे पोलीस संरक्षण नसलेले महाराष्ट्रातील कदाचित एकमेव आमदार असावेत. आताही आमदार झाल्यानंतर त्यांना पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून त्यांना दोन शस्त्रधारी अंगरक्षक पुरवण्यात आले होते. परंतु त्यांनी पुन्हा एकदा पोलीस संरक्षण घेण्यास नकार दिला आहे. याविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, संपूर्ण इंदापूर तालुका हेच माझे कुटुंब असून माझ्या कुटुंबामध्ये वावरताना मला कुठल्याही प्रकारच्या सुरक्षेची गरज भासत नाही.

# मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल भाजपा अक्कलकोट तालुक्याच्या वतीने फटाक्यांचे आतिषबाजी करत जल्लोष

## ढोल-ताशांच्या दणदणाटात कार्यकर्त्यांचा जल्लोष; पेढे वाटून केला आनंदोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट: (तालुका प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचे निवड झाल्याबद्दल अक्कलकोट शहर व तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने अक्कलकोट शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांचे आतीशबाजी करत जल्लोष करण्यात आला.




महाराष्ट्र राज्यात विधानसभेचे निवडणूक होऊनही गेल्या बारा दिवसापासून राज्याचे मुख्यमंत्री कोण होणार या कडे राज्याची लक्ष लागले होते. अखेर गुरुवार पाच डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे, अजितदादा पवार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व विविध राज्यातून आलेले विद्यमान मुख्यमंत्री, संत महंत व भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसह महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शपथविधी सोहळा पार पडला आणि अक्कलकोट शहर व तालुका भारतीय जनता पार्टीच्या यांच्या वतीने ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांचे आतिषबाजी करत भारतीय जनता पक्षाचा विजय असो देवेंद्र फडणवीस तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है ! आमदार सचिन कल्याणशेट्टी तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है ! भारत माता की जय व वंदे मातरम असे विविध घोषणा देत पेढे वाटून जल्लोष करण्यात आला. याबरोबरच अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील अक्कलकोट मैंदर्गी,दुधनी, जेऊर, तडवळ, नागणसूर, तोळणूर, सलगर, वागदरी,चपळगाव, हन्नूर, दहिटणे, वळसंग,कुंभारी, बोरामणी, मुस्ती, तांदुळवाडी आधी भागात भारतीय जनता पक्षासह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. याप्रसंगी शिवशंकर वाले, यशवंततात्या धोंगडे, महेश हिंडोळे, मिलन कल्याणशेट्टी, रमेश कापसे, अंबण्णा चौगुले, शिवशंकर चनशेट्टी, बबलु कामनुरकर,आनंद खजूरगिकर सर ,आनंद पवार , विनोद मदने, नावेद डांगे, सिद्दू चौगुले, सुनिल गवंडी, वैजनाथ मुकडे, उदय नरेगल, स्वप्नील फुकाळे,अभि लोकापुरे, चंद्रकांत दसले,शरणु कापसे ,अतिष पवार, देविदास गवंडी सिध्दाराम माळी, बबलु भागानगरे,हुसेन बागवान, रवि साठे, नितिन जामदार,अमित कोळी, विजय लाडगे,भारत भाडेकर,नुर शेख, शेखर वाले, निशात निबाळकर , राजू कोतवाल,सचिन शिदे , गोविंद शिंदे, चेतन शिदे ,महादेव कामनुरकर, अक्षय तारापुरे,जगदिश बिराजदार, लाला राठोड,रूद्रु स्वामी, संजय जमादार, धनजय गाडवे,नितुराज बडगर, सूर्यकांत बाचके, राजाराम पवार,निखिल शिदे शिवराज तडवळ,दिनेश शेडम, शिखदर चाऊस,वैजुनाथ मुकडे,नागराज, कलबुर्गी,अनमोल सुरवसे, गर्जेंद्र कोळी सागर शिंदे, प्रमोद कलशेट्टी,चंदन पाटील, गितकुमार पवार, अभिजीत चव्हाण,विरेश कळ्ळीमठ,बसवराज स्वामी, शिवराज तडवळ,सिध्दु माशेट्टी सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ.भीमराव रामजी आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज धाराशिव**

डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांना आपण सर्वजण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावाने ओळखतो,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थतज्ञ, कायदेपंडित, विश्वरत्न, बोधिसत्व, महामानव, परमपूज्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संविधानाचे जनक म्हटले जाते ६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांचे निधन झाले दरवर्षी डॉ. बाबासाहेबांच्या पुण्यतिथीचा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून साजरा केला जातो. यावेळी राज्यसह देशभरातील डॉ. बाबासाहेबांचे लाखो अनुयायी दादर चैत्यभूमी येथे एकत्र येतात.

परीनिर्वाण म्हणजे काय.

परीनिर्वाण म्हणजे मृत्यूनंतरचे निर्वाण परिनिर्वाण हे बौद्ध धर्माच्या अनेक मुख्य तत्वा पैकी एक आहे यानुसार जो मनुष्य निर्वाण प्राप्त करतो तो संसारिक ,आसक्ती, इच्छा आणि जीवनातील दुःखापासून मुक्त राहतो यासोबतच तो जीवन चक्रातून मुक्त राहतो पण निर्वाण मिळवणे सोपे नाही त्यासाठी सदाचारी आणि धार्मिक जीवन जगावे लागते बौद्ध धर्मात भगवान गौतम बुद्धांच्या वयाच्या ८० व्या वर्षी झालेल्या मृत्यूला महापरिनिर्वाण म्हणतात.

महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोरगरिबांची स्थिती सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे समाजातील अस्पृश्यतेसाठी अनेक प्रथा नष्ट करण्यात त्यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले बौद्ध धर्माचे अनुयायी मानतात की त्यांचे बुद्ध गुरु देखील डॉ. बाबासाहेबासारखे सद्गुरु होते बौद्ध अनुयायांच्या मते डॉ.बाबासाहेबांनाही त्यांच्या कार्यातून निर्वाण मिळाले आहे. म्हणूनच त्यांची पुण्यतिथी महापरिनिर्वाण दिन म्हणून साजरा केला जातो.


महापरीनिर्वाण दिन कसा साजरा होतो.

संविधान निर्माते डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या पुण्यतिथीला म्हणजेच ६ डिसेंबर रोजी लोक त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत दिवे आणि मेणबत्ती पेटवतात यावेळी डॉ. बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहण्यात येते डॉ. बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहण्यासाठी चैत्यभूमीवर बाबासाहेबांचे अनुयायी लाखोंच्या संख्येने जमा होतात.

अंधारच होता ज्यांच्या नशिबी त्यांना प्रकाशाचे दान दिलं तुमचे मानावे किती उपकार बाबा तुम्हीच देशाला संविधान दिलं.

सहा डिसेंबर छप्पन साली वेळ कशी ती हेरली दुस्टकाळाने भिमरायांची काळ ज्योत ती चोरली.

बुद्धम् शरणम् गच्छामी,  
धम्मम शरणम् गच्छामी,  
संगम शरणम् गच्छामि,  
दैनिक, यश सिद्धी न्यूज कुटुंबातर्फे



महामानव, डॉ. बाबासाहेबाना विनम्र अभिवादन.

**सुधाकर एम रणदिवे (जिल्हा प्रतिनिधी धाराशिव)**

# ६ डिसेंबर महापरीनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चरित्रावर आधारित विशेष लेख

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील लोकांच्या परिचयाचे नाव आहे, त्या मागचं कारणही तसच आहे. अस्पृश्य म्हणून संबोधल्या जाणाऱ्या समाजात,कुटूंबात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला होता. तत्कालीन समाज व्यवस्थेत उच नीचतेने, जाती भेदाने सर्व सामान्य लोकांचे जगणे मुश्किल केले होते.



माणसासारख्या माणसाचा विटाळ मानला जात होता.माणूस तर सोडा त्याच्या सावलीचाही विटाळ मानला जात होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वाट्यालाही या समाज व्यवस्थेच दुःख आलं होतं, या समाज व्यवस्थेचा त्रास बाबासाहेबांनाही मोठ्या प्रमाणात झाला होता, बाबासाहेबांनाही या समाज व्यवस्थेने अस्पृश्य म्हणून हिनवलं होतं. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वाभिमानी, दूरदृष्टी, अभ्यासू, जिद्दी स्वभावाचे व्यक्ती होते. अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्याची क्षमता त्यांच्या मध्ये होती. एका ठिकाणी बाबासाहेब म्हणतात अन्याय करणारा पेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो. या त्यांच्या विधानावरून लक्षात येते कि बाबासाहेबांना अन्यायाची फार चीड होती.

आपल्यावर लागलेला अस्पृश्यतेचा कलंक मिठवण्यासाठी, अस्पृश्य तसेच शुद्राती शूद्रांना मानवतेचे अधिकार मिळावेत या साठी शिक्षण हे प्रमुख माध्यम आहे हे बाबासाहेबांनी ओळखलं होतं. वर्गाच्या बाहेर बसून बाबासाहेबांना शिकावं लागलं, शिक्षणासाठी व एक चांगला माणूस बनण्यासाठी बाबासाहेबांनी वाटेल तो मान अपमान सहन करण्याची क्षमता ठेवली होती. कधी उपाशी पोटी तर कधी मिळेल ते खाऊन बाबासाहेब अभ्यास करत होते. सातारा येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षणासाठी बाबासाहेबांना त्यांचे वडील मेजर रामजींनी मुंबई येथे आणले होते. मुंबई मधील एल्फिन्स्टन हायस्कूल मध्ये बाबासाहेबांनी मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण घेतले होते. १९०७ ला मॅट्रिक उत्तीर्ण करून बाबासाहेब पुढील शिक्षणासाठी मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये जात होते.

बिक्कट परिस्थितीतुन शिक्षण घेऊन मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे त्या काळातील अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या समाजातील पहिले विध्यार्थी होते.म्हणून त्यांच्या त्या यशाने मुंबई मधील डबक चाळी मध्ये राहणाऱ्या सर्वांनाच खूप आनंद झाला होता. बाबासाहेबांना घडवण्यामध्ये त्यांचे वडील रामजी यांचा सुद्धा खूप मोठा हात आहे.मुंबई येथे बी.ए.पर्यंतचे शिक्षण घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. कोलंबीया विध्यापीठात एम.ए.तसेच पी एच डी.ची पदवी संपादन केली.बाबासाहेबांना परदेशात शिक्षणासाठी मदत मिळावी म्हणून गुरुवर्य कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी महाराजा सयाजी राव गायकवाड यांच्या कडून शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिली होती. कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी बाबासाहेबांना बुद्ध चरित्र नावाचे एक पुस्तक ही भेट दिले होते.अमेरिकेतील अभ्यास क्रम करून पुढील एम एस स्सी व डी एस. स्सी पदवी साठी बाबासाहेब लंडनला गेले. तिथे त्यांनी सदरील पदव्या संपादन करून शिक्षण क्षेत्रात खूप मोठं प्राविण्य मिळवल होतं.

शिक्षणाचा व पदाचा वापर केवळ स्वतः च्या कुटूंबासाठी,गाडी बंगला या साठी न करता, शिक्षण घेऊन समाजाचा उद्धार करणे हा बाबासाहेबांचा विचार म्हणजे समाज परिवर्तनाची ललकारीच होय.त्या काळातील सर्वात मोठी पोस्ट घेऊन बाबासाहेब ऐशो आरामात जीवन जगू शकले असते. परंतु बाबासाहेबांनी समाजातील अन्याय, अत्याचार,उच - नीचता, भेदभाव या विरुद्ध आवाज उठवण्याचा निर्णय घेतला. माणसासारख्या माणसाला माणूस म्हणून जगता यावे अशी समाज व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी आपलं सर्वस्व पणाला लावण्याची तयारी दर्शवली होती. कुटुंबावर अनेक प्रकारची संकटे आली, स्वतःची मुलं दगावली परंतु बाबासाहेबांनी त्या दुःखात न बुडता, वर्षानुवर्षे हाल अपेष्ठा सहन करणाऱ्या समाजाला दुःखातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. त्या साठी सत्याग्रह असतील, वृत्तपत्र असतील, पक्ष, संघटना असतील असे अनेक विविध उपक्रम बाबासाहेब राबवत होते. गोलमेज परिषदेला सुद्धा हजर राहून अस्पृश्यांच्या समस्या कडे ब्रिटिशांचे लक्ष वेधून घेण्याचे काम त्यांनी केले होते. भारतात लोकशाही प्रस्थापित होऊन सर्वांना सारखेच अधिकार मिळावेत, सर्वांनाच स्वाभिमानाने जगता यावे, अन्यायाच्या विरोधात न्याय मागता यावा. या साठी त्यांनी संविधान लिहिण्याची जिम्मेदारी स्वतः च्या खांद्यावर घेतली.भारताचे संविधान लिहिण्यासाठी ६०-७० देशांच्या संविधानाचा त्यांनी अभ्यास केला होता. दिवस रात्र मेहनत घेऊन त्यांनी भारतीय संविधान लिहिण्याच काम केलं. त्यांच्या या मेहनतीमुळेच आज प्रत्येक भारतीयाला कायद्यापुढे समान न्याय मिळाला, मतदानाचा अधिकार मिळाला, संघटना, पक्ष स्थापन करण्याचा अधिकार मिळाला, लिहिण्याचा, वाचण्याचा, बोलण्याचा अधिकार मिळाला.

महिलांनाही समानतेचे अधिकार मिळाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, महात्मा फुले, संत कबीर, गौतम बुद्ध यांना गुरु स्थानी मानून बाबासाहेबांनी अखिल भारतीयांच्या कल्याणासाठी अहोरात्र कष्ट, मेहनत घेतली. भारतातला बुद्ध पुन्हा जागा केला. भारतीय समाज जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणले. आणि सरते शेवटी ६ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेबांचे महापरीनिर्वाण झाले. अश्या या क्रांतीसूर्यास महामानवास विनम्र अभिवादन. जय भीम नमो बुध्दाय...

**साभार :- व्याख्याते प्रा. परमेश्वर बनकर, बीड ९५०३२८८२८२**

## बार्टीकडुन अनुयायांना भोजन वाटप

## देशभरातून लाखो आंबेडकरी बांधव मुंबई दाखल

# बार्टी पुस्तक स्टॉलवर पुस्तके खरेदी करण्यासाठी भीमसैनिकांनी केली प्रचंड गर्दी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/ प्रतिनीधी : भारतीय राज्यघटनेचे निर्माते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर मुंबई येथे अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो आंबेडकरी बांधव येत असतात.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव श्री विजय वाघमारे, बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली भीम अनुयायांना डॉ बाबासाहेब आंबेडकर व ईतर महापुरुषांच्या जिवनावरिल मौल्यवान पुस्तके अल्प दरात १५% दराने उपलब्ध करून देण्यात आली असुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड, भारताचे संविधान, महामानव, बुद्ध आणि त्याचा धम्म , व ईतर महामानवाचे पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

आज ५ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शिवाजी पार्क मैदानातील बार्टी पुस्तक स्टॉल, तसेच भोजन वाटप स्टॉलचे उद्धघाटन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या हस्ते करण्यात आले. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलेल्या अनुयायांना ८५ टक्के सवलतीच्या दरात पुस्तकांचा संच तसेच भोजन वाटप करण्यात आले. यावेळी बार्टीच्या निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, उमेश सोनवणे, रविन्द्र कदम, शुभांगी पाटिल, डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे श्री नागसेन कांबळे, रवि गरुड, शिरिष चिखलकर, सदानंद मोहिते, बबन राजापरकर, सिताराम पवार, अलंकार जाधव, विलास कांबळे, अमोल निकाळजे, बार्टीचे श्रीमती नसरिन तांबोळी, सुमेध थोरात, आदी उपस्थित होते.

भीम अनुयायांनी बार्टी पुस्तक स्टॉलवर पुस्तके खरेदी करण्यासाठी प्रचंड गर्दी केली अनुयायांनी रांगेत उभे राहून भारताचे संविधान, महामानव, बुद्ध आणि त्यांचा धम्म, तसेच अन्य महापुरुषांचे पुस्तके खरेदी करुन महामानवास विनम्र अभिवादन केले.

बार्टीतर्फे अनुयायांना भोजन पॅकेट व पिण्याचे पाणी वाटप करण्यात येत आहे.

भीम अनुयायांनी बार्टी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी केले आहे..